(दिनांक ३० एप्रिल १९६६ च्या महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना.)

## अधिसूचना

### महाराष्ट्र शासन

### सामान्य प्रशासन विभाग

सचिवालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० एप्रिल १९६६

**महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४.**

क्रमांक ओएफएल-१०६६(एक)/एम.—महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५) याचे कलम १, पोट-कलम (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे १ मे १९६६ ही तारीख उक्त अधिनियमाची कलमे ४ व ६ यांचे उपबंध अमलात आणण्यासाठी नियुक्त करीत आहे.

---

**फौजदारी व्यवहार संहिता, १८९८.**

क्रमांक ओएफएल. १०६६(दोन)/एम.—फौजदारी व्यवहार संहिता, १८९८ (सन १८९८ चा अधिनियम क्रमांक ५) महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्या संहितेच्या कलम ५५८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि याबाबतीत काढण्यात आलेल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचना निष्प्रभावित करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, दिनांक १ मे १९६६ पासून, पुढील प्रयोजनाव्यतिरिक्त (बृहन्मुंबईतील उच्च न्यायालय व फौजदारी न्यायालये यांखेरीज) राज्यातील सर्व फौजदारी न्यायालयांची भाषा मराठी असेल असे ठरवीत आहे :—

(१) दोषारोप.

(२) बजावणीसाठी व अंमलबजावणीसाठी इतर राज्यांकडे पाठविणे आवश्यक असतील असे रिट, अधिपत्रे, समन्स, नोटिसा आणि इतर आदेशिका आणि तत्संबंधी पत्रव्यवहार.

(३) शवपरीक्षेच्या टिप्पण्या आणि वैद्यकीय व तज्ज्ञ साक्षीदारांचा पुरावा.

(४) अध्यासी अधिकाऱ्यांनी नोंदलेल्या पुराव्याच्या इंग्रजी टिप्पण्या.

(५) युक्तिवादांच्या टिप्पण्या.

(६) न्यायनिर्णय व आदेश.

(७) जिल्हा न्यायालय व उच्च न्यायालय यांच्याकडे केलेल्या अपिलांचे व पुनरीक्षणाचे कागदपत्र (पेपर बुक्स).

(८) उच्च न्यायालयास सादर करणे आवश्यक असलेले कामकाज (न्यायिक व प्रशासनिक दोन्ही)

(९) उच्च न्यायालय किंवा सांख्यिकी केंद्रे यांच्याकडे पाठवावयाची नियतकालिक पत्रके व विवरणपत्रके.

(१०) लेखा अर्थसंकल्पीय अंदाज यासंबंधीची सर्व लेखा पुस्तके व पत्रके आणि विवरणपत्रके आणि सेवाविषयक बाबींसंबंधीचा पत्रव्यवहार.

(११) शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचना.

(१२) विभागीय परीक्षा

(१३) विभागीय चौकशीसंबंधीच्या बाबी; त्यांत, अहवाल आणि उच्च न्यायालय व शासन यांच्याशी त्यावर केलेला पत्रव्यवहार यांचा समावेश होतो :

परंतु, पुढील प्रयोजनासाठी ती भाषा इंग्रजी देखील असू शकेल :—

(अ) रोजनामा,

(ब) जंत्या,

(क) अपिलांची ज्ञापने.

(ड) प्रशासकीय आदेश.

(ढ) उच्च न्यायालय व शासन, यांच्याशी पत्रव्यवहार.

(फ) सेवापुस्तके, प्रवासभत्ता बिले, वेतन बिले आणि इतर बिले.

---

**दिवाणी व्यवहार संहिता, १९०८**

क्रमांक ओएफएल-१०६६(तीन)/एम.--दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ (सन १९०८ चा अधिनियम क्रमांक ५) महाराष्ट्र राज्यास लागू करताना, उक्त संहितेचे कलम १३७, पोट-कलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, आणि याबाबतीत काढण्यात आलेल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचना निष्प्रभावित करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे,—

(अ) यासोबत जोडलेल्या अनुसूची 'अ' मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रयोजनांसाठी असेल त्या शिवाय उच्च न्यायालयाच्या अधीन असलेल्या सर्व (बृहन्मुंबईत उच्च न्यायालयाच्या अधीन असलेल्या दिवाणी न्यायालयांखेरीज), दिवाणी न्यायालयांची भाषा, दिनांक १ मे १९६६ पासून, मराठी असेल :

परंतु, यासोबत जोडलेल्या अनुसूची 'ब' मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी ती भाषा इंग्रजीदेखील असू शकेल.

(ब) अशा न्यायालयांकडे करावयाचे मराठी अर्ज आणि त्यात मराठीतून चालणारे कामकाज देवनागरी लिपित लिहिले जाईल;

असे जाहीर करीत आहे.

**अनुसूची 'अ'**

१. बजावणीसाठी व अंमलबजावणीसाठी इतर राज्यांकडे पाठविणे आवश्यक असतील असे रिट, अधिपत्रे, समन्स, नोटिसा आणि इतर आदेशिका आणि तत्संबंधी पत्रव्यवहार.

२. वैद्यकीय व तज्ज्ञ साक्षीदारांचा पुरावा.

३. अध्यासी अधिकाऱ्यांनी नोंदलेल्या पुराव्याच्या इंग्रजी टिप्पण्या.

४. युक्तिवादांच्या टिप्पण्या.

५. न्यायनिर्णय व आदेश.

६. इतर राज्यांकडे अंमलबजावणीसाठी हस्तांतरित केलेले हुकूमनामे व आदेश व तत्संबंधी पत्रव्यवहार.

७. जिल्हा न्यायालय व उच्च न्यायालय यांच्याकडे केलेल्या अपिलांचे व पुनरीक्षणाचे कागदपत्र (पेपर बुक्स).

८. उच्च न्यायालयास सादर करणे आवश्यक असलेले कामकाज (न्यायिक व प्रशासनिक–दोन्ही)

९. उच्च न्यायालय किंवा सांख्यिकी केंद्रे यांच्याकडे पाठवावयाची नियतकालिकपत्रके व विवरणपत्रके.

१०. लेखा, अर्थसंकल्पीय अंदाज यासंबंधीची सर्व लेखा-पुस्तके व पत्रके आणि विवरणपत्रके आणि सेवांविषयक बाबींसंबंधीचा पत्रव्यवहार.

११. शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करावयाच्या अधिसूचना.

१२. विभागीय परीक्षा.

१३. विभागीय चौकशीसंबंधीच्या बाबी; त्यांत, अहवाल व उच्च न्यायालय व शासन यांच्याशी यावर केलेला पत्रव्यवहार यांचा समावेश होतो.

अनुसूची 'ब'

१. रोजनामा.
२. वादपदे.
३. जंत्या.
४. अपिलांचे ज्ञापन व उलट आक्षेप.
५. प्रशासकीय आदेश.
६. उच्च न्यायालय व शासन यांच्याशी पत्रव्यवहार.
७. सेवापुस्तके, प्रवासभत्ता बिले, वेतन बिले व इतर बिले.

---

**महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४,**

क्रमांक ओएफएल-१०६६(चार)/एम.—महाराष्ट्र राज्यभाषा अधिनियम, १९६४ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५) याच्या कलम ६, पोट-कलम (१) व कलम (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम, १९६६ असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ याच्या कलम ४ च्या प्रयोजनाकरिता पुढील प्रयोजने ही वर्जित प्रयोजने असतील :—

(१) भारतीय राजदूतावास, वाणिज्यिक कार्यालय व व्यापारविषयक आयोग यांसह भारत सरकार व त्याच्या अधीन असलेली कार्यालये यांच्याशी पत्रव्यवहार.

(२) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४६ च्या परंतुकात उल्लेखिल्याप्रमाणे तसा करारनामा नसलेल्या कोणत्याही राज्य सरकारशी पत्रव्यवहार;

(३) परराष्ट्रीय राजदूतावास किंवा वाणिज्यदूतावास यांच्याशीं पत्रव्यवहार;

(४) त्या काळापुरत्या अंमलात असलेल्या कोणत्याही विधिद्वारे किंवा तदन्वये प्रस्थापित व अशा विधिअन्वये न्यायिक किंवा न्यायिकवत शक्तींचा वापर करणाऱ्या कोणत्याही न्यायाधिकरणाने, मंडळाने किंवा प्राधिकरणाने (मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) दिलेले निर्णय किंवा आदेश;

(५) महालेखापालाकडे द्यावयाचे लेखे;

(६) महालेखापालाशी पत्रव्यवहार;

(७) वैध अभिप्रायांबाबतची सर्व विवरणपत्रके आणि सर्व वैध अभिप्राय, वैध टाचणे, विधिविधान किंवा हस्तांतरलेखन याबाबतचे सर्व ठराव आणि विधिविधानांची व हस्तांतर लेखनांची प्रारूपे, उच्च न्यायालयातील व सर्वोच्च न्यायालयातील अभियोगासंबंधीच्या बाबी, वैध संकलने आणि विधिपरीक्षा;

(८) नोटरीबाबत अधिनियम, १९५२ याची अंमलबजावणी;

(९) भारतीय विधि प्रतिवृत्ते;

(१०) वैद्यकीय औषधी योजना, शवपरीक्षा अहवाल व न्याय वैद्यकीय प्रकरणांतील अहवाल आणि राज्य सरकारच्या वैद्यकीय विभागातील तत्सम तांत्रिक बाबी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द्वा. रा. प्रधान,**
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

(यथार्थ अनुवाद)
**वा. ना. पंडित,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.